महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख (म.राज्य) . पुणे

दूसरा व तिसरा मजला . नवीन प्रशासकीय इमारत . विधान भवन समोर . कॅम्प . पुणे १

दूरध्वनी क्र. ०२०-२६१२६०७२

Email ID :dlrmah.mah@nic.in

---

वाचा :- १. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख.(म.राज्य) पुणे परिपत्रक क्रमांक /एस व्ही सी आर २६४५/ स-३/१९९४ पुणे दिनांक १२/१२/१९९४.

२. या कार्यालयाकडील परिपत्रक क्रमांक ना.भू.१/परिपत्रक/मिळकतपत्रिका पुनर्गठण/२०२१ पुणे दिनांक २१/०६/२०२१.

---

क्रमांक/ना.भू.१/परिपत्रक नों.क्रमांक ३/२०२४ पुणे दिनांक:-२७/०७/२०२४.

## विषय - स्वयंसूची धारीका अद्यावत करणेबाबत.

परिपत्रक

नगर भूमापन कार्यालयात इकडील कार्यालयाकडून तपासणी केली असता स्वयंसुची धारीका संधारण करताना अक्षम्य निकाष्काळजीपणा होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे. स्वयंसुची धारीका या अर्धन्यायिक कामकाजातील एक महत्वाचा पुरावा म्हणून जतन करणे संधारण करणे अनिवार्य आहे. परंतू सर्व कार्यालयामध्ये या बाबीकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष केले जाते व त्यामुळे अनेक कायदेशीर बाबी उदभवतात व तक्रारी निर्माण होतात. पर्यायाने खात्याची प्रतिमा मलिन होते व शासकीय अधिकारी / कर्मचारी म्हणून आपली विश्वासार्हता धोक्यात येते. इकडील कार्यालयाकडील परिपत्रक क्रमांक /एस व्ही सी आर २६४५/ स-३/१९९४ पुणे दिनांक १२/१२/१९९४ रोजीचे परिपत्रकामध्ये स्वयंसूची धारीका १०० -१०० च्या गठयात बांधून ठेवणेबाबत सूचना दिलेल्या आहेत. सदर स्वयंसूची धारीकांचे गठ्ठे मोठे होत असलेस त्या ५०-५० च्या गठयात बांधून कापडी बस्त्यात सुरक्षित ठेवाव्यात. प्रत्येक स्वयंसूची धारीकेस जॅकेट फॉर्म लावून त्यातील सर्व रकाने व्यवस्थित भरावेत. तसेच धारीकेस पानांक देवून परिरक्षण भूमापक / निमतानदार यांनी जॅकेट फार्मवर दिनांकित स्वाक्षरी करावी. तसेच स्वंयसूची धारीका हया नगर भूमापन क्रमांकाप्रमाणे ठेवाव्यात, म्हणजे धारीका सापडणे सोपे जाईल.

तसेच नगर भूमापन अधिकारी / उप अधीक्षक भूमि अभिलेख यांनी स्वयंसूची धारीका अदयावत आणताना पूर्वीचे फेरफार नोंदीचे कागदपत्र संबंधित स्वयंसूची धारीकेत सामील झालेले आहेत याची खात्री करावी व नंतरच नोंद मंजूरीची कार्यवाही करावी. तसेच फेरफार नोंद मंजूर होताच तीही कागदपत्रे

स्वयंसूची धारीकेत समाविष्ट करुन त्यांना पानांक देवून जॅकेट फार्म अदयावत भरुन घ्यावेत व परिरक्षण भूमापन / निमतानदार यांना जॅकेट फार्मवर स्वाक्षरी करुन धारीकेची अनुक्रमणीका अदयावत करावी.

या परिपत्रकाद्वारे आपणास सूचीत करणेत येते की, वर नमुद परिपत्रकान्वये स्वयंसूची धारीका संधारण करणेबाबत कार्यवाही करणे अनिवार्य आहे. परंतु दुर्दैवाने याबाबीचे विस्मरण झाल्याचे दिसून येते. तसेच पर्यवेक्षणाच्यावेळेस ही बाब तपासणी केली जात नाही. त्यामुळे जनतेला अभिलेखापासून वंचित राहावे लागते. सर्व जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांनी त्याचे अधिनस्त परिरक्षण / निमतानदार यांचे तपासणीचा वर्षभराचा कार्यक्रम तयार करावा. त्यामध्ये अधिनस्त प्रत्येक परिरक्षण भूमापक / निमतानदार यांचेकडील स्वयंसूची धारीकांची वर्षभरामध्ये किमान दोन वेळा तपासणी होईल याची दक्षता घ्यावी. या तपासणी मध्ये प्रामुख्याने पुढील बाबी तपासून त्याबाबत आवश्यक लेखी सूचना दयाव्यात.

१) सर्व स्वयंसूची धारीकाची तपासणी करावी.
२) गहाळ स्वयंसूची धारीकाचे पुर्नगठण करुन घ्यावे. याबाबत वाचा क्रमांक २ मधील नमुद केलेप्रमाणे.
३) जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, किमान १०% स्वयंसूची धारीका स्वत: तपासणी करावी व स्वयंसूची धारीका संधारण करणेबाबत आवश्यक निर्देश दयावेत.

सर्व उप अधीक्षक भूमि अभिलेख/नगर भूमापन अधिकारी यांनी त्यांचे अधिनस्त सर्व परिरक्षण भूमापक यांच्या स्वयंसूची धारीका पुढील दोन महामध्ये तपासून पूर्ण करणेचे आहेत. तसेच यापुढे प्रत्येक फेरफाराची स्वयंसूची धारीका वर नमुद परिपत्रकाप्रमाणे संधारण करणेत आली किंवा कसे? याबाबत फेरफार मंजूरीनंतर स्वत: खात्री करणेची आहे.

कार्यालयात उपलब्ध स्वयंसूची धारीकेची माहिती पुढील नमुन्यात संधारण करणेत यावी. तसेच सध्या कार्यालयात संधारण केलेल्या स्वयंसूची धारीकांची माहिती याच नमुन्यात दिनांक ३०/०८/२०२४ पर्यंत या कार्यालयास न चुकता सादर करावी. काही कार्यालयाची तपासणी जमाबंदी आयुक्त कार्यालयाकडील पथक नेमुन करणेत येणार असलेने तपासणी वेळी खालील नमुन्यात नोंदवही संधारण करुन तपासणी वेळी उपलब्ध करुन दयावी. यामध्ये त्रुटी राहणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच गहाळ स्वयंसूची धारीका पुर्नगठीत करणेसाठी विहित कार्यवाही करावी. गहाळ स्वयंसूची धारीकेबाबत महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ च्या कलम ७(१), ८(१) कलम ९ प्रमाणे कार्यवाही करावी, व गहाळ धारीकेबाबत महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ मध्ये नमुद तरतुदीप्रमाणे आवश्यक कार्यवाही होण्यासाठी संबंधीत पोलीस ठाणे येथे तक्रार /गुन्हा दाखल करुन त्यांची पोहच धारीकेत सामील करावी. मिळकत पत्रिकेचे पुर्नगठणाचे सुचना दिल्या आहेत. त्याप्रमाणे स्वयंसूची धारिकेचे पुर्नगठण करावे. उपसंचालक भूमि अभिलेख यांनी त्यांचे स्तरावरुन सदर आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

## स्वयंसूची धारीकाबाबत नोंदवहीचा नमुना

| अ.क्र. | कार्यालयाचे नांव | गावाचे नाव | नगर भूमापन क्रमाक | नोदीची सख्या | नोदनिहाय पानांची संख्या | स्वयंसूची धारीका उपलब्ध नसलेल्या नोदीचा क्रमांक | स्वयंसूची धारीका उपलब्ध नसलेल्या नोदीचा प्रकार | स्वयंसूची धारीका उपलब्ध नसलेल्या नोंदीचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |

Signed by
Sachindra Pratap Singh
Date: 27-07-2024 22:33:20

(सचिंद्र प्रताप सिंह)
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे.

प्रत :- स्वीय सहायक, जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म. राज्य) पुणे यांना माहितीसाठी.

प्रत :- उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न जमाबंदी आयुक्त (सर्वसाधारण)/(भूमापन)/(ना.भू.)/(एकत्रीकरण) पुणे यांना माहितीस्तव.

प्रत :- उपसंचालक भूमि अभिलेख, पुणे ,मुंबई, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागरपूर यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत :- जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, सर्व यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.